महाराष्ट्र शासन
क्र. संगृधो - २००१/ प्र.क्र.१८८/१४-स,
सहकार व वस्त्रोद्योग विभाग
मंत्रालय, मुंबई ३२
दिनांक ९ ऑगस्ट, २००१.

वाचा : सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्रमांक गृहनिर्माण / गाळा तबदील/फी/८९, दिनांक २७-११-१९७९ चे परिपत्रक.

ज्या अर्थी, सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी तयार केलेल्या नमुनेदार उपविधीना सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिनांक ०२-०७-२००१ रोजी मान्यता दिली असून हया नमुनेदार उपविधीमधील उपविधी क्र. ३८(ई) मध्ये नमूद केल्यानुसार, सहकारी गृहनिर्माण संस्थेमधील सदनिका / गाळा हस्तांतरित (तबदील) करताना आकारवयाच्या प्रिमीयमचे कमाल दर ठरविण्याचे अधिकार राज्य शासनाच्या सहकार व वस्त्रोद्योग विभागाला दिलेले आहेत, आणि

ज्या अर्थी , सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्यांच्या परिपत्रक क्र. गृहनिर्माण /गाळा तबदील फी/८९, दिनांक २७-११-१९७९ अन्वये प्रिमीयमचे दर निश्चित केलेले असून सद्यःस्थितीत प्रस्तुत परिपत्रक रद्द करुन राज्यशासनाने त्याबाबतचे आदेश प्रस्तुत करणे अगत्याचे झालेले असल्याने सहकारी गृहनिर्माण संस्थेमधील सदनिका / गाळा हस्तांतरित (तबदील) करताना आकारण्याच्या प्रिमीयम संबंधी योग्य ते आदेश काढण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, त्या अर्थी

आ दे श

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, कलम ७९-अ अन्वये राज्य शासनास प्रदान झालेल्या अधिकाराचा वापर करुन राज्यातील जनतेच्या व्यापक जनहितार्थ पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

१) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रक क्र. गृहनिर्माण / गाळा तबदील /फी/८९, दिनांक २७-११-१९८९ रद्द करण्यात येत आहे.

२) सभासदाची सहकारी गृहनिर्माण संस्थेमधील सदनिका / गाळा आणि त्याचे संस्थेच्या भागभांडवल / मालमत्तमधील भाग व हक्क दुसऱ्याकडे हस्तांतरित (तबदिल) करताना आकारवयाच्या प्रिमीयमचा दर संस्थेच्या सर्वसाधारण सभेमध्ये निश्चित करावेत.

मात्र संस्थेच्या सर्वसाधारण सभेने ठरविलेले प्रिमीयमचे दर कोणत्याही परिस्थितीत खाली दर्शविण्यात आलेल्या कमाल दरापेक्षा जास्त असू नयेत.

	विभाग	आकारावयचा प्रिमीयमचा दर (रुपये)
१.	महानगर पालिका व प्राधिकारण क्षेत्र	२५,०००/-
२.	" अ" वर्ग नगर पालिका	२०,०००/-
३.	" ब" वर्ग नगर पालिका	१५,०००/-
४.	" क" वर्ग नगर पालिका	१०,०००/-
५.	ग्रामपंचयती (ग्रामीण क्षेत्र)	५,०००/-

सदर आदेश तात्काळ अंमलात येतील.
महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशनुसार व नावाने,

सही /-
(वसंत पोरेपडडीवर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन
सहकार व वस्त्रोद्योग विभाग

----------******----------

जा.क्र.गृह/डी-३/हस्तातरण शुल्क/ परिपत्रक २००२
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था
महाराष्ट्र राज्य, पुणे -१ यांचे कार्यालय,
दिनांक :- 3/8/ २००७.

प्रति,

१. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व)
२. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व)
३. सहाय्यक निबंधक / तालुका उपनिबंधक सहकारी संस्था, (सर्व)

सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे करिता.